# -: प्रमाणपत्र :-

श्री. प्रा. राजशेखर शरणाप्पा नरूभे यांनी "निर्मलकुमार फडकुले यांचे ललित लेखन" ("हिरव्या वाटा" व "आनंदाची डहाळी" या संग्रहांच्या आधारे) या विषयावर माझ्या मार्गदर्शनाखाली समाधानकारकरीतीने लघु-प्रबंधाचे लेखन केले आहे. प्रस्तुत लेखनातील विश्लेषण, विवेचन स्वतंत्र असून यातील कोणताही मजकूर अभ्यासकाने इतरत्र कुठेही उपयोगात आणलेला नाही.

प्रस्तुतचा विषय हा "ललित लेख" या वाङ्मय प्रकारातील आहे.

हा लघु-प्रबंध शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्याकडे एम.फिल. (मराठी) परीक्षेच्या परीक्षणासाठी अभ्यासकाने सादर करण्यास माझी अनुमती आहे.

**दिनांक :- ३०/१२/१९९६**

मार्गदर्शक
(डॉ. डी. टी. माने)

२१-०६-१९९७

(डॉ. राजशेखर हिरेमठ)
मराठी विभाग प्रमुख
संगमेश्वर महाविद्यालय,
सोलापूर.

प्र[redacted]
संगमेश्वर [redacted] महाविद्यालय,
सोलापूर.

## -: प्रतिज्ञापत्र :-

मी प्रा. राजशेखर शरणाप्पा नळगे प्रतिज्ञापूर्वक सांगतो की, "निर्मलकुमार फडकुले यांचे ललित लेखन" (हिरव्या वाटा" व "आनंदाची डहाळी" या संग्रहांच्या आधारे) या विषयावरील लघु-प्रबंध शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना एम.फिल. (मराठी) या परीक्षेसाठी सादर करीत आहे.

हा लघु-प्रबंध मी स्वत: लिहिलेला असून तो पूर्णपणे स्वतंत्र आहे. यापूर्वी अन्य कुठल्याही परीक्षेसाठी मी तो सादर केलेला नाही. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना प्रथमच हा लघु-प्रबंध मी सादर करीत आहे.

दिनांक : ३०/१२/१९९६.

अभ्यासक,

प्रा. राजशेखर शरणाप्पा नळगे.

## मनोगत

मी मूळ मराठवाडयातील जळकोट ता. तुळजापूर माध्यमिक शिक्षण घेत असताना सोलापूरहून प्रसिध्द होणा-या दै. केसरी, दै. संचार, दै. तरुण भारत ही वृत्तपत्रे वाचत असताना त्यात डॉ. निर्मलकुमार फडकुले यांचे वैचारिक आणि ललित लेख माझ्या वाचनात आले. त्या लेखांनी मी प्रभावित झालो. पुढे महाविदयालयीन शिक्षणासाठी मी सोलापूर शहरी आलो. या कालखंडात मी त्यांची अनेक व्याख्याने ऐकली. त्यांचे लेखन आणि त्यांचे वक्तृत्व यांचा माझ्या मनावर प्रभाव पडला. म्हणून एम.फिल. या पदवी परीक्षेसाठी जेव्हा लघु-प्रबंध लिहायचा असे समजले तेव्हा माझ्या मनात त्यांच्या ललित लेखांवर आपण संशोधन-समीक्षा करावी असे वाटले. त्याचवेळी माझ्या वाचनात "हिरव्या वाटा" (१९८६) व "आनंदाची डहाळी" (१९८८) हे ललित लेख संग्रह वाचनात आले. मराठी ललित गदयातील वाङ्मय प्रकारात या संग्रहांनी चांगली भर घातली असे मला वाटले. म्हणून हा विषय मी निवडला.

डॉ. निर्मलकुमार फडकुले महाराष्ट्रात प्रसिध्द आहेत ते एक वक्ते म्हणून, सुंदर भाषाशैली आणि चिंतनशील विचार यामुळे त्यांची व्याख्याने महाराष्ट्रभर गाजत आहेत. त्यांची व्याख्याने सुंदर आणि प्रभावी असतात. कारण त्यांच्या व्याख्यानातील आशयाला आणि अभिव्यक्तीला लालित्याचा स्पर्श झाला आहे. हाच स्पर्श त्यांच्या ललित लेखनातही जाणवतो. "हिरव्या वाटा", "आनंदाची डहाळी", "जगायचं कशासाठी", "रंग एकेकाचे", "प्रिय आणि अप्रिय" अशी त्यांची पाच ललित गदयात्मक पुस्तके आहेत. पण यामध्ये "हिरव्या वाटा"

व "आनंदाची डहाळी" ही प्रारंभीची पुस्तके असल्यामुळे त्यांच्या ललित निबंधाची भूमिका आणि ललित निबंधाचे स्वरूप या दृष्टीने महत्वाची ठरतात. कारण त्यांच्या ललित लेखकाच्या पाऊलखुणा त्यात उमटल्या आहेत, म्हणून या दोन पुस्तकांची निवड केली.

डॉ. फडकुले "वक्ते" म्हणून प्रसिद्ध असले तरी त्यांच्यातील लेखकांकडे कांही अंशाने दुर्लक्ष झाले आहे असे मला वाटते. त्यांच्यातील "वक्ता" जेवढा प्रभावी आहे तेवढाच त्यांच्यातील "ललित लेखक" ही प्रभावी आहे. म्हणून त्यांच्या ललित लेखनाचा एक साहित्य प्रकार म्हणून अभ्यास करावा आणि त्यातून त्यांच्या व्यक्तिमत्वातील विलोभनीय वैशिष्टयांचे दर्शन घडवावे या भूमिकेतून लघु-प्रबंधासाठी मी या विषयाची निवड केली.

ललित निबंध हा आत्मनिष्ठ वाङ:मय प्रकार असल्यामुळे तो लेखकाच्या व्यक्तिमत्वाशी निगडीत असतो आणि लेखकाचे व्यक्तिमत्व हे त्याच्या जीवन-संस्कारातून, जीवनानुभवातून निर्माण होत असते, म्हणून या दृष्टीने मी या लघु-प्रबंधात त्यांच्या साहित्याबरोबर आणि त्याच बरोबर त्यांच्या जीवन-चरित्रातून त्यांच्या व्यक्तिमत्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. असा प्रयत्न पहिलाच असेल असे मला नम्रपणाने नमूद करावेसे वाटते. त्यादृष्टीने मी त्यांना विचारलेले प्रश्न आणि त्या प्रश्नाना त्यानी मनमोकळेपणानी दिलेली उत्तरे यातून जी मुलाखत तयार झालेली आहे ती महत्वाची ठरण्यास हरकत नाही असे मला वाटते.

असा विषय निवडण्यात मला माझे मार्गदर्शक डॉ.डी.टी.माने, संगमेश्वर महाविदयालयातील मराठी विभाग प्रमुख डॉ. राजेंद्र बिडकर आणि

मराठीचे प्राध्यापक डॉ· राजशेखर हिरेमठ हे डॉ· फडकुले यांचे विद्यार्थी असल्यामुळे आणि गेली तीस वर्षे त्यांच्या सहवासात असल्यामुळे त्यांनी त्यांचे साहित्य आणि व्यक्तितत्व याबद्दल मला बरीच माहिती पुरविली, मार्गदर्शन केले याबद्दल मी या तीन्ही गुरुजनांचा अत्यंत ऋणी आहे· अर्थात बरीचशी माहिती पुरविण्यास डॉ· निर्मलकुमार फडकुले यांनी अनेक व्यापातून वेळ काढून मदत केली म्हणून मला त्यांचाही कृतज्ञतापूर्वक उल्लेख करावासा वाटतो·

हा अभ्यास करण्यासाठी संदर्भ ग्रंथांची आवश्यकता असते· त्यादृष्टीने बॅ· खर्डेकर ग्रंथालय शिवाजी विदयापीठ कोल्हापूर, डॉ· बा·आ·मराठवाडा विदयापीठ ग्रंथालय, औरंगाबाद, संगमेश्वर महाविदयालय ग्रंथालय, सोलापूर जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विदयालय ग्रंथालय, अणदूर यांचे सहाय्य लाभले म्हणून मी त्यांचा आभारी आहे·

अर्थात शिक्षण प्रसारक मंडळ अणदूरचे सचिव आदरणीय श्री· सि·ना·आलुरे गुरुजी, जवाहर महाविदयालयाचे प्राचार्य, जवाहर विदयालयातील गुरुवर्य भ·वि· कुलकर्णी तसेच संगमेश्वर महाविदयालयातील डॉ· महादेव देशमुख, डॉ· सौ· गीता जोशी आणि माझ्या महाविदयालयातील प्रभारी प्राचार्य एम· एम· लंगडे यानी वेळोवेळी मार्गदर्शन व प्रेरणा दिल्याबद्दल मी त्यांचाही आभारी आहे·

पण हे सारे संशोधनाचे कार्य मी कौटुंबिक स्वास्थ्याशिवाय पूर्ण करु शकलो नसतो· माझे बंधू श्री भिमाशंकर नळगे यांच्या प्रेरणेचाही मला कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला पाहिजे·

माझ्या या लघु-प्रबंधाचे टंकलेखनाचे कार्य श्री चक्रपाणी कदम यांनी वेळेवर आणि सुबकरित्या केल्याबद्दल मी त्यांचाही ऋणी आहे·



राजशेखर शरणप्पा नळगे·